# राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना :-

शासन निर्णय क्र. पीआरई २०११/प्रक्र२४९/प्राशि-१, दि. ११ जुलै २०११ नुसार २७ ऑगस्ट २०१० पासून विद्यार्थ्यांच्या बाबत घडलेल्या दुर्घटना संदर्भात लाभा मीळू शकतो. या योजनेअंतर्गत इ. १ ली ते १२ पर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा शासन विमा उतरवून घेते अशा विद्यार्थ्यांचा अपघातामूळे कायम अपंगत्व किंवा मृत्यु झाला असल्यास या योजनेतून लाभ देवू शकतो. एक अवयव किंवा एक डोळा निकामी झाल्यास रु. ३००००/- दोन अवयव किंवा एक अवयव व एक डोळा निकामी किंवा दोन डोळे निकामी झाल्यास रु. ५००००/- व मुत्यु झाल्यास रु. ७५०००/- इतकी भरपाई मीळू शकते. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये १९ लाभार्थ्यांना रु. १४.२५ लक्ष वितरित करण्यात आले आहेत.